**Pune District Education Association'**
**Shankarrao Ursal College of Pharmaceutical Sciences and Research Center, Kharadi, Pune-14.**

---

Media Coverage of College Activities

सकाळ



खराडी : उरसळ फार्मसी महाविद्यालयास मिळालेला पुरस्कार स्वीकारताना प्राचार्य ॲड. अशोक भोसले.

## उरसळ महाविद्यालयास पुरस्कार

खराडी, ता. २२ : पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे खराडी येथील शंकरराव उरसळ कॉलेज ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस ॲंड रिसर्च सेंटर या महाविद्यालयास 'प्लास्टिक संकलन आणि प्लास्टिक पुनर्वापर महाविद्यालय' व 'उत्कृष्ट स्वच्छ महाविद्यालय' हे पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. हे पुरस्कार पुणे येथील सुभद्रा माऊली या संस्थेच्या वतीने देण्यात आले.

प्लास्टिक संकलन व पुनर्वापर अभियानात महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रत्येक महिन्याच्या २२ तारखेला उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन प्लास्टिक संकलन केले. संपूर्ण संकलित प्लास्टिक एकत्र करून संस्थेच्या माध्यमातून सागर मित्र प्लास्टिक कलेक्शन सेंटर पुणे यांच्याकडे विविध वस्तू बनवण्यास दिले जाते, असे प्राचार्य डॉ. अशोक भोसले यांनी सांगितले.

पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी सुभद्रा माऊली प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण मोरे, उपप्राचार्य डॉ. विजया बर्गे, पदविका महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन कोतवाल, विभाग प्रमुख डॉ. सुमित काकडे तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमात महाविद्यालयाचे विद्यार्थी मयूर रणसिंग व ज्ञानेश्वरी ढोले यांनी प्लास्टिक वापराचे हानिकारक परिणाम याबद्दल आपले विचार व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा. तेजस्विनी कदि यांनी केले. आभार डॉ. प्रशांत खाडे यांनी मानले.

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical
Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014

२ || प्रभात पुणे, शनिवार, दि. २२ जुलै २०२३

# शंकरराव उरसळ महाविद्यालयास पुरस्कार

## प्लॅस्टिक संकलन अभियानाची दखल

प्रभात वृत्तसेवा



पुणे : पुरस्काराचा स्वीकार करताना शंकरराव उरसळ महाविद्यालयाचे मान्यवर.

पुणे, दि. २१ - खराडी येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळ संस्थेचे शंकरराव उरसळ कॉलेज ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस अँड रिसर्च सेंटर महाविद्यालयास 'प्लॅस्टिक संकलन आणि प्लॅस्टिक पुनर्वापर महाविद्यालय' व 'उत्कृष्ट स्वच्छ महाविद्यालय' पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त सुरू करण्यात आलेल्या प्लॅस्टिक संकलन अभियानास एक वर्ष पूर्ण होत आहे. या निमित्ताने सुभद्रा माऊली या संस्थेने महाविद्यालयास पुरस्काराने सन्मानित केले. सुभद्रा माऊली प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण मोरे म्हणाले की, महाविद्यालयाने सुरू केलेले प्लॅस्टिक मुक्त अभियान आणि प्लॅस्टिक संकलन हे उपक्रम अतिशय कौतुकास्पद आहे. संपूर्ण संकलित प्लॅस्टिक एकत्र करून संस्थेच्या माध्यमातून सागर मित्र प्लॅस्टिक कलेक्शन सेंटरकडे विविध वस्तू बनवण्यास दिले जाते, असे प्राचार्य डॉ. अशोक भोसले यांनी सांगितले. उपप्राचार्या डॉ. विजया बर्गे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्राचार्य डॉ. सचिन कोतवाल, डॉ. सुजित काकडेसह आदी उपस्थित होते. प्लॅस्टिक संकलन अभियान समन्वयक प्रा. तेजस्विनी कादे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रशांत खाडे यांनी आभार मानले.

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical
Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

सकाळ
पुणे, शनिवार, ६ मे २०२३

# शंकरराव उरसळ महाविद्यालयात प्लास्टिक संकलन उपक्रम

खराडी, ता. ५ : आपल्याला भेडसावत असलेल्या पर्यावरणीय समस्यांपैकी प्लास्टिक ही गंभीर समस्या आहे. आपल्या परिसरातील प्लास्टिक संकलन करून या मानवनिर्मित समस्येचे निर्मूलन करण्याचा प्रयत्न आपण सर्वांनी मिळून करावा, असे आवाहन पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे यांनी केले.

खराडी येथील शंकरराव उरसळ कॉलेज ऑफ फार्मास्युटिकल सायन्स अँड रिसर्च सेंटर संस्थेचे अध्यक्ष आणि महाराष्ट्राचे विरोधी पक्ष नेते अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त गेल्या एका वर्षापासून प्रत्येक महिन्याच्या २२ तारखेला प्लास्टिक संकलनाचा उपक्रम राबविला जातो. असे घाडगे यांनी सांगितले. या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी समाजामधील वेगवेगळ्या ठिकाणांना भेट देऊन प्लास्टिकमुळे होणारे दुष्परिणाम याबाबत जनजागृती करत आहेत. असे प्राचार्य डॉ. अशोक भोसले यांनी सांगितले. या वेळी समन्वयक प्रा. तेजस्विनी कांदे ,शिक्षक आणि विद्यार्थी या अभियानात सहभागी झाले होते.

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical
Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

सकाळ TODAY

पुणे, मंगळवार,
१८ फेब्रुवारी २०२० ४

# विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास महत्त्वाचा

## एल. एम. पवार यांचे मत; खराडीतील उरसळ फार्मसी महाविद्यालयात स्नेहसंमेलन

**मुंढवा, ता. १७ :** केवळ अभ्यास हेच ध्येय न ठेवता कला, क्रीडा, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रातही विद्यार्थी पारंगत झाला पाहिजे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच उद्दिष्ट शैक्षणिक संस्था व महाविद्यालयांचे असले पाहिजे, असे मत पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे उपसचिव एल. एम. पवार यांनी व्यक्त केले.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या खराडी येथील शंकरराव उरसळ फार्मसी महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण कार्यक्रम प्रसंगी पवार बोलत होते.

या प्रसंगी माजी आमदार बापू पठारे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक भोसले, खराडीचे माजी सरपंच बाळासाहेब पठारे, प्राचार्य पंडित शेळके, प्राचार्या रंजना पाटील, अश्विनी शेवाळे, जयश्री जावीर, शिल्पा खांडरे, अरुणा गुळुंजकर, उपप्राचार्या विजया बर्गे आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी विद्यार्थ्यांनी विविध राज्यांचा सांस्कृतिक वारसा दर्शविणारे फॅशन शो, नृत्ये, गायन-वादन, सामाजिक नाट्यछटा, महिला सशक्तीकरण, प्रदूषण व पर्यावरण जनजागृती, प्रबोधनपर गीते सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली. कार्यक्रमाचे संयोजन प्राध्यापिका तृषा शंग्रपवार व सीमा केंजळे यांनी केले. प्राचार्य सचिन कोतवाल यांनी आभार मानले.



खराडी : स्नेहसंमेलनात विविधतेत एकता दाखविणारे नृत्य सादर करताना उरसळ महाविद्यालयाचे विद्यार्थी.

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical
Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

प्रभात पुणे, गुरुवार, दि. २७ ऑगस्ट २०२० ॥ ५

# उरसळ फार्मसी महाविद्यालयात 'राष्ट्रीय सद्भावना दिन'

**विश्रांतवाडी, दि. २६ (प्रतिनिधी)** - भारताचे माजी पंतप्रधान व आधुनिक भारताचे शिल्पकार राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या खराडी येथील शंकरराव उरसळ फार्मसी महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सद्भावना दिन ऑनलाइन पद्धतीने साजरा करण्यात आला.

समाजामध्ये राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्म समभाव, सामाजिक ऐक्य, शांतता, ममता व प्रेम ही मूल्ये आजच्या युवकांनी अंगीकारणे महत्त्वाचे आहे व दुसऱ्या व्यक्तीविषयी आपल्या मनामध्ये चांगले विचार असणे गरजेचे आहे. स्वतंत्र भारत देशाला प्रगतीपथावर पोहोचवण्यासाठी अत्याधुनिक सुविधांची आवश्यकता तरुण युवा पिढीला उपलब्ध करून देण्यासाठी राजीव गांधी सतत प्रयत्नशील होते, असे प्रतिपादन या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मा. व्यवस्थापन सदस्य डॉ. अशोक भोसले यांनी केले.

महाविद्यालयाचे पदविका विभागाचे प्राचार्य ॲड. सचिन कोतवाल यांनी राजीव गांधी यांच्या सर्वसमावेशक धोरणांची माहिती दिली, अशा प्रेरणादायी धोरणांचा आजच्या युवा पिढीने कोणत्याही प्रकारचा जात, वंश, धर्म किंवा भाषाविषयक भेद न करता आपल्या आचरणात उपयोग करावा, असे आवाहन विद्यार्थ्यांना केले. विद्यार्थी ऋतुजा धुमाळ, रूपेश परदेशी, ऐश्वर्या भांगे, वर्षा चौधरी, शिवानी सूर्यवंशी, ममताकुमार चौधरी यांनी राजीव गांधी यांचे व्यक्तिमत्त्व व सामाजिक कार्य याविषयी आपले विचार मांडले. प्रा. प्रियांका बोरुडे यांनी कार्यक्रमाचे औचित्य साधून सर्व उपस्थितांनी सद्भावना प्रतिज्ञा दिली. यावेळी उपप्राचार्या डॉ.विजया बर्गे, डॉ. रवींद्र पाटील, प्रा. मनोज जोगराणा उपस्थित होते. सूत्रसंचालन महाविद्यालयाचे विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. प्रशांत खाडे यांनी केले तर प्रा. तृषा शंग्रपवार यांनी आभार मानले.

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical
Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

२ पुढारी MY पुणे शुक्रवार, १३ मार्च २०२०

# उज्ज्वल भवितव्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहा : ॲड. संदीप कदम

पुणे : पुढारी वृत्तसेवा

जागतिकीकरणामुळे करिअरच्या अनेक संधी आता उपलब्ध झाल्या आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सोशल मीडियावर वेळ घालविण्याऐवजी स्वतःच्या उज्ज्वल भवितव्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहावे, असे आवाहन पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे सचिव ॲड. संदीप कदम यांनी आज येथे केले.

जिल्हा शिक्षण मंडळाच्या वतीने विविध शाखांत पदवी मिळालेल्या विद्यार्थ्यांचा पदवीग्रहण समारंभ नुकताच पार पडला. या वेळी बारा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली.

जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. आर. एस. माळी, संस्थेचे मानद सचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सिनेट सदस्य ॲड. संदीप कदम, खजिनदार ॲड. मोहनराव देशमुख, उपसचिव एल. एम. पवार, सहसचिव ए. एम. जाधव तसेच सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, परीक्षा अधिकारी, उपप्राचार्य, एनएसएस व एनसीसी प्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी पालक उपस्थित होते.



विद्यार्थ्यांच्या पदवीग्रहणप्रसंगी उपस्थित मान्यवर व विद्यार्थी.

या वेळी विद्यापीठात सुवर्णपदक मिळालेल्या कु. काजल महाजन, कु. दामिनी जाधव यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे ओतुर, हडपसर, सासवड, पौडरोड, सांगवी, नसरापूर, आकुर्डी, पिरंगुट, मांजरी, खराडी या महाविद्यालयातील विविध शाखांमधून पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. अभय खंडागळे यांनी तर आभार उपप्राचार्य डॉ. शितोळे यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. शिल्पागौरी गणपुले व प्रा. सुवर्णा शिंदे यांनी केले.

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical
Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

**प्रभात** पुणे, बुधवार, दि. ३ फेब्रुवारी २०२१ **3**

# 'राष्ट्रीय ई-पोस्टर' प्रेझेंटेशन स्पर्धा उत्साहात

**विश्रांतवाडी, दि. २ (प्रतिनिधी)** - पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या खराडी येथील शंकरराव उरसळ कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये राष्ट्रीय स्तरावरील ई-पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा उत्साहात पार पडली.

आंध्र प्रदेश, कर्नाटक, गोवा, गुजरात, तमिळनाडू यासह राज्यातील ११० स्पर्धकांसमोर महाविद्यालयातील प्रतिनिधींनी स्पर्धेत आपली पोस्टर प्रदर्शित केली. रोल ऑफ फार्मसी प्रोफेशनल्स इन कोविड - १९, फार्मासिस्ट - युवर मेडीसिनल कौन्सिलर, ऑनलाईन फार्मसी विरुद्ध रिटेल फार्मसी आणि नॉव्हेल कन्सेंट इन ड्रग स्टोअर मॅनेजमेंट आदी विषयांचे वैविध्य असणाऱ्या या स्पधचे उद्घाटन एनसीएलचे माजी वैज्ञानिक डॉ. भास्कर इदगे यांनी केले. यावेळी डॉ. भास्कर इदगे, प्राचार्य डॉ. अशोक भोसले, प्राचार्य डॉ. रिया दायारमाणी, प्रा. डॉ.विजया बर्गे यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्राचार्य ॲड.सचिन कोतवाल यांनी केले. सुत्रसंचालन प्राध्यापिका प्रियांका बोरुडे यांनी तर प्रा. आश्विनी बनकर यांनी आभार केले. प्रा. मनोज जोगराना यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

Keep Record.
Notice board
03/02/21

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical
Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

# लोकमत

epaper.lokmat.com

पुणे, सोमवार, दि. ८ मार्च २०२१ ३


## स्त्री कर्तृत्वाला मानाचा मुजरा

प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी
पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे
**शंकरराव उरसळ कॉलेज ऑफ फार्मसी, खराडी, पुणे**

कोर्सेस : D.Pharm, M. Pharm & Ph.D
संपर्क : 020-27011106
www.pdeasudpharm.edu.in


Advertisement and News file

**PRINCIPAL**
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical
Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

गुड मॉर्निंग



खराडी : शंकरराव उरसळ फार्मसी महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे स्वागत करतान प्राचार्य तसेच प्राध्यापक.

# विद्यार्थ्यांना मास्क देऊन महाविद्यालयांमध्ये स्वागत

## उरसळ फार्मसी महाविद्यालयांत उपक्रम

**विश्रांतवाडी, दि. १५ (प्रतिनिधी)** - महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या आदेशानुसार प्रथम वर्ष पदविका व पदवी ५० टक्के हजेरी नियमानुसार अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे नियमित वर्ग सोमवारपासून खराडी येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या शंकरराव उरसळ कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयांमध्ये सुरू करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. अशोक भोसले यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना मास्क व गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

कोवीड-१९ संसर्गापासून कोणती काळजी घ्यायची याविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

डिजिटल थर्मोमिटरद्वारे विद्यार्थ्यांचे शारीरिक तापमान नियमित तपासण्यात येणार आहे, आवारात क्लासरुम, लॅबोरेटरी, ग्रंथालय व कार्यालय या सर्व ठिकाणी सॅनिटायझरची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे, असे पदविका विभागाचे प्राचार्य अँड. सचिन कोतवाल यांनी सांगितले.

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

महाराष्ट्र टाइम्स । पुणे । बुधवार, १० फेब्रुवारी २०२१ 

# उरसळ कॉलेजमध्ये ऑनलाइन स्पर्धा

**म. टा. प्रतिनिधी**, पुणे

माजी केंद्रीय मंत्री, खासदार शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त खराडी येथील शंकरराव उरसळ फार्मसी महाविद्यालयामध्ये रिसर्च अविष्कार स्पर्धेचे ऑनलाइन पद्धतीने आयोजन करण्यात आले होते. या संशोधन स्पर्धेमध्ये विविध विभागांतील ६० विद्यार्थ्यांनी आपले संशोधन सादर केले.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे उपसचिव एल. एम. पवार यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्‍घाटन झाले. 'करोना संक्रमणास संकट न समजता एक नवीन संधी म्हणून पाहावे,' असे पवार म्हणाले. 'विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या गुणवत्तावाढीसाठी व त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी संस्थेने ११ ते २३ डिसेंबर या कालावधीत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते,' असे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य व फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अशोक भोसले यांनी सांगितले.

'पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या विविध महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांसाठी रिसर्च आविष्कार संशोधन स्पर्धा त्यांचे नवनवीन युक्तिवाद व कल्पना मांडण्यासाठी एक मोठी संधी आहे,' असे फार्मसी महाविद्यालयाचे

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : मंगेश आडे : ८०१०३२६८१९

दैनिक
# शिवस्वराज्य

संपादक : श्री. आकाश लक्ष्मण बारड मो. नं. : ९११२२२१२७०
Email ID : akashbaraddainikshivswarajya@gmail.com

Regi. No. MH150018885 अंक :5038 वे
दिनांक : 22 जून 2021
वर्ल्ड ऑफ टायटन शेजारी, दसरा चौक, कोल्हापूर -४१६००२
Web Site : www.dainikshivswarajya.in

## शंकरराव उरसळ फार्मसी महाविद्यालयांमध्ये जागतिक योगदिन साजरा

हवेली प्रतिनिधी/अनिल कोतवाल

पुणे, दिनांक २१

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या खराडी येथील शंकरराव उरसळ फार्मसी महाविद्यालयांमध्ये जागतिक योग दिन उत्साहात ऑनलाइन पद्धतीने साजरा करण्यात आला. योग गुरु श्री. आनंद आचार्य यांनी योगाचे महत्त्व, आरोग्यसाठी उपयुक्तता, योगाची गरज, योग का करावा, ध्यानधारणा कशाप्रकारे करावी याविषयीचे मार्गदर्शन केले, तसेच उपस्थितांकडुन योगाची प्रात्यक्षिके करून घेतली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक भोसले यांनी उपस्थितांचे स्वागत करत, कोरोना संक्रमणाच्या काळात आपले शारीरिक व मानसिक स्वास्थ्य जपण्यासाठी योगा करणे जास्त उपयुक्त आहे. स्वतःबरोबरच आपल्या कुटुंबीयांची काळजी घेत विद्यार्थ्यांनी स्वतःच्या मनावरील ताणतणाव कमी करण्यासाठी व निरोगी आरोग्य जपण्यासाठी नियमित ध्यानधारणा व योगा करणे आवश्यक आहे असे प्रतिपादन केले



आजच्या परिस्थितीमध्ये प्रत्येकाने योगा करणे आवश्यक आहे त्यामुळे मनाची एकाग्रता व उत्तम शरीर स्वास्थ्य मिळून प्रतिकार शक्ती वाढू शकते, असे मत यावेळी पदविका विभागाचे प्राचार्य अॅड. सचिन कोतवाल यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी व शिक्षक, शिक्षकेतर सेवक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अश्विनी बनकर व संपूर्ण नियोजन प्रा. मनोज जोगराणा व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. सुजित काकडे यांनी केले.

## राजसाहेब ठाकरे यांचे वाढदिवसानिमित्त सुनील तुपे यांचे भरघोस कार्य



कोल्हापूर/अविनाश शेलार

महाराष्ट्राचे युवा स्थान मराठी जनतेचे खंबीर नेतृत्व राज यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेना संस्थापक वाढदिवसानिमित्त कोल्हापुरातील युवा कार्यकर्ते व उपशहराध्यक्ष सुनिल तुपे यांचेमार्फत पिपीई किटचे वितरणमनसे शहराध्यक्ष नगरसेवक राजू दिडोर्ले यांचे शुभहस्ते प्राथमिक आरोग्य केंद्र मोरे माने नगर येथे वैद्यकीय अधिकारी सौ. सुशिला पावरा यांचेकडे करणेत आले, तसेच राजू दिडोर्ले नगरसेवक शहराध्यक्ष यांच्या तर्फे सायबर कॉलेज कोविड सेंटर मध्येअन्नधान्याचे वाटप करण्यात आले. यावेळी निलेश लाड, शहरसचिव सुनिल तुपे, उपशहराध्यक्ष विनोद वाशिकर, चंद्रकांत सूकते, जिल्हा सचिवप्रसाद पाटील, जिल्हाउपाध्यक्ष अमित पाटील, शहरसचिव निलेश लाड, उपशहराध्यक्ष अजिंक्य कांबळे, रणजित वरेकर, प्रतिश माने, सागर साळोखे, रोहित आवळे, विशाल भोरे इ. प्रमुख उपस्थित होते.

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

# शंकरराव उरसळ फार्मसी महाविद्यालयामध्ये ऑनलाईन "निरोप समारंभ " साजरा..!

जुलै १०, २०२१

पुण्य वार्ता
१० जुलै २०२१ रोजी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या शंकरराव उरसळ कॉलेज ऑफ फार्मसी खराडी महाविद्यालयात ऑनलाईन "निरोप समारंभ "साजरा करण्यात आला.यानिमित्त महाविद्यालया द्वारे अंतिम वर्ष पदवी, पदविका व पद्युत्तर पदवी च्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन सांस्कृतीक कार्यक्रम आयोजित करण्यात आला तसेच विद्यार्थ्यांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. अशोक भोसले उपस्थीत होते. यावेळी पदविका प्राचार्य अॅड. सचिन कोतवाल सर उपस्थीत होते. प्रा. भोसले सर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या तसेच कोतवाल सरांनी देखील विद्यार्थांना मार्गदर्शन केले. शिक्षक वर्गामधुन पदवी विभागाच्या उपप्राचार्या डॉ. विजया बर्गे व पदविकाचे शैक्षणिक विभाग प्रमुख प्रा. मनोज जोगराना यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांमधुन प्रातिनिधिक स्वरूपात कृष्णा नलावडे, रूपेश परदेशी,अक्षदा गव्हाणे ,अवंतिका पठारे, सिध्दांत डोळस, वैभव सानप, प्राजक्ता काळभोर, तुषार हुंबे व श्वेता पवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले.तसेच यादरम्यान आयोजित केलेल्या सांस्कृतीक कार्यक्रमात अंकिता कदम,रिंकु दहिंजे ,पल्लवी गिरसे, प्रांजल गायकवाड, प्रिती रायपुरे, वैभवी घुले, श्रेया साळुंखे व प्राजक्ता अत्तरकी या विद्यार्थांनी सहभाग नोंदवून उत्कृष्ट सादरीकरण केले. सदर कार्यक्रमास सर्व विद्यार्थांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. सदर कार्यक्रमाचे आयोजन व सुत्रसंचालन प्रा. प्रशांत खाडे व प्रा. सीमा केंजळे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. अश्विनी बनकर यांनी केले. या ऑनलाईन कार्यक्रमाला डॉ. अमित कसबे यांचे तांत्रिक सहकार्य लाभले.

लेबल: पुणे 11

Next
महाराष्ट्र राज्य मुंबई सलग्न मराठी पत्रकार संघाच्या वतीने मुरबाड येथे नामफलकाचे उद्‌घाटन व छत्री वाटप (http://www.punyavarta.in/2021/07/blog-post_21.html)

Previous
अकोले तालुक्यातील शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ मिळवून देण्यात राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या किसान सेलला यश किसान सभेचे तालुकाध्यक्ष - जालिंदर बोडके (http://www.punyavarta.in/2021/07/blog-post_74.html)

टिप्पणी पोस्ट करा

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

# रयतेचा कैवारी

संपादक :- श्री. शाहू संभाजी भारती (९९७५७३८३२१) वर्ष दुसरे - अंक २९८ बुधवार दिनांक ०४/०८/२०२१ पान ०४

## शंकरराव उरसळ फार्मसी महाविद्यालयात ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

पुणे : दि. ०३ ( रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा ) महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ना. अजितदादा पवार याच्या वाढदिवसानिमित्त खराडी येथील शंकरराव उरसळ कॉलेज ऑफ फार्मसीच्या वतीने वकृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती, यामध्ये अजितदादा पवार-एक आदर्श नेता, कुशल संघटक व धडाडीचे नेतृत्व, आणि कोरोनामुळे बदललेली शिक्षण पध्दती या विषयावर वकृत्व स्पर्धा पार पडली. विद्यार्थ्यांच्या उस्फुर्त सहभाग हे या स्पर्धेचे वैशिष्ट्य ठरले. विद्यार्थ्यांनी अजितदादा पवार याच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व सास्कृतिक क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल माहिती दिली. या निमित्ताने अजित दादा याची गुणवैशिष्ट्ये अभ्यासुवृत्ती सामान्याशी थेट सपर्क, निर्णयक्षमता, रोखठोकपणा, स्पष्ट शब्दात नाही सागण्याचा गुण, वक्तशिरपणा याची चर्चा करताना या गुणाचा राज्यकारभार करताना केलेला उपयोग विद्यार्थ्यांनी उलगडुन दाखवला. कोरोनामुळे बदललेली शिक्षण पध्दती या विषयावर विद्यार्थ्यांनी भाष्य करताना शिक्षक, विद्यार्थी व पालक याच्या प्रतिक्रिया सागितल्या. स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. अशोक भोसले यानी केले.



प्राचार्य ॲड सचिन कोतवाल यानी प्रास्ताविक करताना उपमुख्यमंत्री अजित दादा पवार याच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या विविध उपक्रमाची माहिती दिली. प्राध्यापक विपुल घसाडे व प्राध्यापिका आश्विनी बनकर यानी परीक्षण केलेल्या या स्पर्धेचे सयोजन प्राध्यापक मनोज जागराना यानी केले.

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

पुण्य वार्ता



www.punyavarta.in/2021/08/blog-post_80.html 1/3

> पुणे

# शंकरराव उरसळ फार्मसी महाविद्यालयामध्ये ७५ वा अमृतमहोत्सवी स्वातंत्र्यदिन दिमाखात साजरा

ऑगस्ट १५, २०२१

पुण्य वार्ता
पुणे प्रतिनीधी

१५ ऑगस्ट २०२१ रोजी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या शंकरराव उरसळ कॉलेज ऑफ फार्मसी व खराडी शैक्षणिक संकुलामध्ये ७५ वा अमृतमहोत्सवी स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे वडगाव शेरी विधानसभेचे प्रथम आमदार बाप्पूसाहेब पठारे यांसमवेत नगरसेवक महेंद्र पठारे, नगरसेविका संजिलाताई पठारे ,नगरसेविका सुमनताई पठारे, स्वीकृत नगरसेवक अर्जुनराव टोपे व काळभैरवनाथ समितीचे खजिनदार बाळासाहेब राजगुरू आदि मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यक्रम पदवी विभागाचे प्राचार्य डॉ. अशोक भोसले,पदविका प्राचार्य अॅड. सचिन कोतवाल, मराठी महाविद्यालयीन प्राचार्या जावेर मॅडम,इंग्लिश मिडीयम प्राथमिक विभाग प्राचार्या अरूणा गुळुंजकर,इंग्लिश मिडीयम माध्यमिक विभाग प्राचार्या शिल्पा खांदरे व इतर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी याच्या उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करून पार पडला.ध्वजारोहनानंतर विविध स्पर्धेत विशेष नैपुण्य प्राप्त केलेल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला तसेच यादरम्यान फार्मसी महाविद्यालयाची यशोगाथा सांगणारे न्युज लेटर मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले.यावेळी प्रमुख पाहुणे बाप्पूसाहेब पठारे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना स्वतंत्र्यप्राप्ती साठी केलेल्या बलिदानवीरांना आदरांजली वाहत देशाच्या जडणघडणीत आपला देखील वाटा असावा याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले.

देशभक्तीपर वातावरणात दिमाखात पार पडलेल्या या कार्यक्रमास महाविद्यालयीन कर्मचारी व इतर विद्यार्थीनी देखील आपली उपस्थिती दर्शवून कार्यक्रमास उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. सुजीत काकडे व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्राचार्या. अरूना गुळुंजकर यांनी केले.

लेबल: पुणे 23

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

रयतेचा कैवारी

दुसरे - अंक ३१४ शुक्रवार दिनांक २०/०८/२०२१ पान ०७

# एस यु कॉलेज ऑफ फार्मसी खराडी येथे नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा स्मृतिदिन साजरा



पुणे : दि.१९ ( रयतेचा कैवारी, ऑनलाइन वृत्तसेवा ) संपूर्ण भारत देशामध्ये नेताजी सुभाष चद्र बोस याच्या स्मृतीस अभिवादन करून त्यानी भारत मातेच्या स्वातत्र्यासाठी केलेल्या त्यागाचा बोध सर्वाना होण्यासाठी त्याच्या कार्याची प्रचिती सर्व देशभरात अजरामर राहण्यासाठी देशामध्ये विविध ठिकाणी त्याचा हा स्मृतिदिन साजरा केला जातो त्याच अनुषगाने खराडी येथील शकराव उरसळ फार्मसी कॉलेजमध्ये नेताजी सुभाष चद्र बोस याच्या प्रतिमेस पुष्पहार घालून त्याना आदराजली देण्यात आली. त्याप्रसगी 'पदवी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक भोसले 'पदविका महाविद्यालयाचे प्राचार्य एडवोकेट सचिन कोतवाल 'सास्कृतिक विभाग प्रमुख प्रशात खाडे 'सीमा केजळे यानी नेताजी सुभाष चद्र बोस याच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. त्याप्रसंगी विभाग प्रमुख सुजितकाकडे सर 'विक्रम वीर मनोज जोगराणा,तुषा सग्रपवार, परिक्षाविभाग प्रमुख अश्विनी बनकर ,सचिन पारखी ,सतीश खोपकर ,तुषार हुबे ,राजू पठाण, राजू घिगे, सुनिता करपे, ग्रंथपाल सविता सोनवणे ,मनीषा झाल्टे हे मान्यवर उपस्थित होते.

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical
Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

पुण्य वार्ता
मुख्य संपादक : अशोक कारभारी उगले
मो. ९६८९ ०७० ५१६

# स यु कॉलेज ऑफ फार्मसी खराडी येथे नेताजी सुभाष चंद्र बोस यांचा स्मृतिदिन साजरा

ऑगस्ट २०, २०२१ URL Email

पुण्य वार्ता
पुणे प्रतिनीधी

संपूर्ण भारत देशामध्ये नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या स्मृतीस अभिवादन करून त्यांनी भारत मातेच्या स्वातंत्र्यासाठी केलेल्या त्यागाचा बोध सर्वांना होण्यासाठी त्यांच्या कार्याची प्रचिती सर्व देशभरात अजरामर राहण्यासाठी देशांमध्ये विविध ठिकाणी त्यांचा हा स्मृतिदिन साजरा केला जातो त्याच अनुषंगाने खराडी येथील शंकराव उरसळ फार्मसी कॉलेजमध्ये नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून त्यांना आदरांजली देण्यात आली. त्याप्रसंगी पदवी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक भोसले 'पदविका महाविद्यालयाचे प्राचार्य एडवोकेट सचिन कोतवाल 'सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रशांत खाडे 'सीमा केंजळे यांनी नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. त्याप्रसंगी विभाग प्रमुख सुजितकाकडे सर 'विक्रम वीर मनोज जोगराणा,तुषा संग्रपवार, परिक्षाविभाग प्रमुख अश्विनी बनकर ,सचिन पारखी ,सतीश खोपकर ,तुषार हुंबे ,राजू पठाण, राजू घिगे, सुनिता करपे, ग्रंथपाल सविता सोनवणे ,मनीषा झाल्टे हे मान्यवर उपस्थित होते.

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.



रयतेचा कैवारी

दिनांक 17/10/21

# शंकरराव उरसळ फार्मसी महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा



पुणे : दि.१६ (रयतेचा कैवारी ऑनलाईन वृत्तसेवा) ग्रंथ आमुचे साथी... ग्रंथ आमच्या हाती... ग्रंथ उजळती अज्ञानाच्या ...अंधाराच्या राती.... या उक्ती प्रमाणेच प्रत्येक समाज घटकाने पुस्तका- प्रति प्रेम बाळगून वाचन करणे गरजेचे आहे, वाचन हा फक्त विरंगुळा नाही तर अर्थपूर्ण विरंगुळा आहे कारण मनोरंजनाबरोबरच ज्ञानार्जनाचा प्रमुख हेतू वाचना मागे असतो, असे प्रतिपादन पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या खराडी येथील शंकरराव उरसळ फार्मसी महाविद्यालयात माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम याच्या जन्मदिनानिमित्त "वाचन प्रेरणा दिन" आयोजित कार्यक्रमात महाविद्यालयाचे पदविका विभागाचे प्राचार्य ॲड सचिन कोतवाल यानी व्यक्त करून सर्वांना वाचन प्रेरणा दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

भारतरत्न माजी राष्ट्रपती मिसाइल मॅन, थोर वैज्ञानिक डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम याचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे महत्त्व विशद करताना डॉ. कलाम याच्या जीवन प्रवासावर दृष्टिक्षेप टाकून त्याचे आजच्या युवा पिढीला बाबतचे योगदान महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ विजया बर्गे, डॉ. रवींद्र पाटील, प्रा मनोज जोगराणा यांनी आपल्या शब्दात व्यक्त केले.

महाविद्यालयाचे विद्यार्थी अनुराधा दौडकर, श्वेता खैरटकर, श्रावणी दळवी आणि देवकी खेत्रे या विद्यार्थ्यांनी वाचन प्रेरणा दिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त करून विद्यार्थी जीवनातील ग्रंथालयाचे महत्व व वाचन प्रयत्नातून मिळणारी प्रेरणा याबाबत आपले मत व्यक्त केले.

विद्यार्थ्यांना वाचनालयातील पुस्तकाची जास्तीत जास्त आवड निर्माण व्हावी याकरिता या कार्यक्रमात उपस्थित सर्वांनी ३० मिनिटे पुस्तक वाचन केले. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्रा विक्रम वीर, प्रा सुजित काकडे, डॉ अमित कसबे, प्रशात खाडे, प्रा अश्विनी बनकर, विपुल धसाडे, प्रा विवेक इगळे, श्री संजय जगम आणि सर्व विद्यार्थी उपस्थित होते या कार्यक्रमाचे संपुर्ण नियोजन व प्रास्ताविक महाविद्यालयाच्या ग्रंथपाल सौ सविता सोनवणे तर कार्यक्रमाचे आभार सहाय्यक ग्रंथपाल श्री तानाजी सातव यानी मानले.

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

सकाळ पुणे, गुरुवार, १४ ऑक्टोबर २०२१ ५

# वक्तृत्व स्पर्धेत सायली खांदवे प्रथम

## पुणे जिल्हा शिक्षण मंडळातर्फे आयोजन; काव्यलेखनात रोशनी कदमची बाजी

**पौड, ता. १३ :** राज्याचे उपमुख्यमंत्री, पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त संस्थेच्यावतीने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी घेतलेल्या ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धेत खराडीच्या सायली खांदवे, काव्य लेखनात आकुर्डीच्या रोशनी कदम आणि एकांकिका स्पर्धेत हडपसरच्या सविता वालकर या विद्यार्थिनींनी प्रथम क्रमांक पटकावला.

विविध स्पर्धांतील प्रथम तीन क्रमांकाचे विद्यार्थी आणि महाविद्यालयांची नावे पुढीलप्रमाणे - वक्तृत्व - सायली खांदवे (सासवड), सायली आरुडे (निगडी), प्रतिक्षा पंडित (सासवड). राज्यस्तरीय काव्यलेखन - रोशनी कदम (आकुर्डी), अपर्णा कलंत्री (अमरावती), रोहीत मालपोटे (पौडरोड), राज्यस्तरीय एकांकिका - सविता वालकर (हडपसर), अमृता जाधव (नसरापूर), डॉ. श्वेता मोरे (निगडी).

पीपीटी बनविणे (अध्यापक) - डॉ. मनिषा शेवाळे (बाबूरावजी घोलप महाविद्यालय, सांगवी), डॉ. के. एस. दिव्यश्री (निगडी), प्रा. आकाश बागडे (रामकृष्ण मोरे महाविद्यालय, आकुर्डी). व्हिडिओ बनविणे (अध्यापक) - डॉ. मनिषा शेवाळे (सांगवी), प्रा. विद्या कोठावळे (अनंतराव पवार महाविद्यालय, पिरंगुट), डॉ. एम. एच. मौलवी (अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय, ओतूर), रोबोटिक्स प्रतिकृती बनविणे - श्री. म्हाळसाकांत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, आकुर्डी, पंडित नेहरू विद्यालय, कामशेत, विष्णूजी शेकूजी सातव हायस्कूल, वाघोली.

आविष्कार संशोधन स्पर्धेतील विभागनिहाय प्रथम दोन क्रमांक पुढीलप्रमाणे - फार्मसी - प्रणाली जाधव (सासवड), केतकी थोरात (खराडी), मानवताशास्त्र - विवेकी पास्ता (सांगवी), ऊर्मिला सोनवणे (हडपसर), नितीन सुपेकर (हडपसर), इंजिनिअर ॲण्ड टेक्नॉलॉजी - नेहा जाधव (मांजरी), प्रियांशु पुरोहित (आकुर्डी), मेडीकल - डॉ. निकीता लोलगे (निगडी), डॉ. स्नेहल सुपेकर (निगडी), विज्ञान - प्रज्ञा चव्हाण (हडपसर), दिनेश बेळगावकर (पौडरोड), वाणिज्य - तन्मयी तुलशी (सांगवी), तेजस्विनी कोकीळ (आकुर्डी), अंकिता व्हटकर (सांगवी), व्यवस्थापन - संतोष खलाटे (आकुर्डी), अश्विनी वाल्हेकर (आकुर्डी), कृषी - निषी सुधीर (आकुर्डी), अंकिता महाराणा (आकुर्डी). सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, मानद सचिव ॲड. संदीप कदम, खजिनदार ॲड. मोहनराव देशमुख, उपसचिव एल. एम. पवार, सहसचिव ए. एम. जाधव, अधिक्षक सीताराम अभंग, मूल्यमापन आणि शैक्षणिक संशोधन अधिकारी किरण देशपांडे, अकाउंटंट गोरख सोंडकर यांनी अभिनंदन केले.

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical
Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

डिजिटल शैक्षणिक दैनिक 'स्यतेचा कैवारी' — संपादक :- शाहू संभाजी भारती (वर्ष तिसरे - अंक ०३७) मंगळवार दि.२६/१०/२०२१ पान ०९

# शंकरराव उरसळ फार्मसी खराडी महाविद्यालयात आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत 'स्वच्छ भारत अभियान' उपक्रम

पुणे : दि.२५ ( स्यतेचा कैवारी, ऑनलाइन वृत्तसेवा ) विद्यार्थ्यांच्या मध्ये स्वच्छते बाबत जाणीव निर्माण होऊन त्यांनी समाजामध्ये प्रत्येक घटकाना याचे महत्व पटवून द्यावे तसेच वातावरणाच्या समतोलासाठी सिंगल युज प्लास्टिक चा वापर टाळावा, त्याबाबत समाजात प्रबोधन करावे असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अशोक भोसले यांनी केले, ते भारत सरकारच्या आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत स्वच्छ भारत अभियान निमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

आजादी का अमृत महोत्सव या उपक्रमाअंतर्गत सार्वजनिक ठिकाणची स्वच्छता, तसेच प्लास्टिक कचरा संकलन आणि व्यवस्थापन यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत स्वयंसेवक उत्स्फूर्त सहभाग घेत आहेत असे प्रतिपादन महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा कार्यक्रम अधिकारी व या कार्यक्रमाचे संयोजक प्रा सुजित काकडे यांनी केले.

सहभागी स्वयंसेवकांनी यावेळी महाविद्यालय परिसराची स्वच्छता केली, प्रामुख्याने प्लास्टिक कचऱ्याचे संकलन करून त्याची योग्य ती विल्हेवाट लावली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या पदविका विभागाचे प्राचार्य ॲड सचिन कोतवाल, डॉ. विजया बर्गे, डॉ. रवींद्र पाटील, प्रा. विक्रम वीर, प्रा. कुणाल कणसे, प्रा. विपुल घसाडे, शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुजित काकडे यांनी, तर आभार विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. प्रशांत खाडे यांनी केली.



PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014

सकाळ » TODAY

पुणे, मंगळवार,
१८ फेब्रुवारी २०२०   ४

# विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास महत्त्वाचा

## एल. एम. पवार यांचे मत; खराडीतील उरसळ फार्मसी महाविद्यालयात स्नेहसंमेलन

**मुंढवा, ता. १७ :** केवळ अभ्यास हेच ध्येय न ठेवता कला, क्रीडा, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रातही विद्यार्थी पारंगत झाला पाहिजे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच उद्दिष्ट शैक्षणिक संस्था व महाविद्यालयांचे असले पाहिजे, असे मत पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे उपसचिव एल. एम. पवार यांनी व्यक्त केले.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या खराडी येथील शंकरराव उरसळ फार्मसी महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण कार्यक्रम प्रसंगी पवार बोलत होते.




**खराडी : स्नेहसंमेलनात विविधतेत एकता दाखविणारे नृत्य सादर करताना उरसळ महाविद्यालयाचे विद्यार्थी.**

या प्रसंगी माजी आमदार बापू पठारे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक भोसले, खराडीचे माजी सरपंच बाळासाहेब पठारे, प्राचार्य पंडित शेळके, प्राचार्या रंजना पाटील, अश्विनी शेवाळे, जयश्री जावीर, शिल्पा खांडरे, अरुणा गुळुंजकर, उपप्राचार्या विजया बर्गे आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी विद्यार्थ्यांनी विविध राज्यांचा सांस्कृतिक वारसा दर्शविणारे फॅशन शो, नृत्ये, गायन-वादन, सामाजिक नाट्यछटा, महिला सशक्तीकरण, प्रदूषण व पर्यावरण जनजागृती, प्रबोधनपर गीते सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली. कार्यक्रमाचे संयोजन प्राध्यापिका तृषा शंग्रपवार व सीमा केंजळे यांनी केले. प्राचार्य सचिन कोतवाल यांनी आभार मानले.

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical
Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

रयतेच्या कैवारी

दिनांक - २८/९/२०२२

# शंकरराव उरसळ खराडी फार्मसीतील आरती सावंतला वक्तृत्व स्पर्धेत पारितोषिक




पुणे : दि.२८ ( रयतेचा कैवारी, ऑनलाइन वृत्तसेवा ) पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या खराडी येथील शंकरराव उरसळ फार्मसी महाविद्यालयाची द्वितीय वर्ष बी फार्मसी ची विद्यार्थिनी आरती सावंत हिला कॉप्स विद्यार्थी संघटना महाराष्ट्र राज्य संस्थेमार्फत "महिला शारीरिक व मानसिक दृष्ट्या सक्षम कशा बनू शकतात" या विषयावर राज्यस्तरीय ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेमध्ये पारितोषिक मिळाले, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी व्यवस्थापन सदस्य डॉ अशोक भोसले यांनी दिली.

या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्यातून विविध महाविद्यालयाचे २७० विद्यार्थी सहभागी झाले होते. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे उपाअध्यक्ष मा. श्री राजेंद्र घाडगे, मानद सचिव व सिनेट सदस्य सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मा. अँड. संदीप कदम, खजिनदार मा. अँड. मोहनराव देशमुख, उपसचिव मा. श्री एल. एम. पवार, सहसचिव मा. श्री ए. एम. जाधव व पदविका फार्मसी महाविद्यालय खराडी चे प्राचार्य अँड सचिन कोतवाल यांनी आरतीच्या या वक्तृत्व स्पर्धेतील या यशाबद्दल तिचे व तिला मार्गदर्शन करणारे महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक यांचे कौतुक केले.

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

५

सकाळ

पुणे, मंगळवार,
१५ फेब्रुवारी २०२२

## उरसळ फार्मसी महाविद्यालयात हुतात्मा दिन

**मुंढवा** : स्वतंत्र भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी म्हणजे भारताच्या स्वातंत्र्याचा अमर असा दीपस्तंभ आहेत. सत्य, अहिंसा आणि शांतता या मार्गाने आपण सर्वजण आनंदाने राहू शकतो. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी हेच आपल्या जीवनाचे ब्रीद असायला हवे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. अशोक भोसले यांनी केले. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या शंकरराव उरसळ फार्मसी महाविद्यालय खराडी येथे हुतात्मा दिन निमित्त आयोजित कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भोसले बोलत होते. यावेळी पदविका महाविद्यालयाचे प्राचार्य ॲड. सचिन कोतवाल, डॉ. रवींद्र पाटील, प्रा. विक्रम वीर, प्रा. मनोज जोगराणा, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमात श्रुती पठारे आणि आसिफ शेख यांनी हुतात्मा दिनानिमित्त आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. विजया बर्गे, सूत्रसंचालन प्रा प्रशांत खाडे, तर आभार प्रा. तेजस्विनी कांदे यांनी मानले.

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical
Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

सकाळ

पुणे, बुधवार,
१६ फेब्रुवारी २०२२ ४

## उरसळ महाविद्यालयात लतादीदींना श्रद्धांजली

मुंढवा, ता. १५ : पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या खराडी येथील शंकरराव उरसळ फार्मसी महाविद्यालयात गानकोकिळा लता मंगेशकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. या वेळी प्राचार्य डॉ. अशोक भोसले व ॲड. सचिन कोतवाल, वरिष्ठ प्राध्यापक डॉ. रवींद्र पाटील, उपप्राचार्या डॉ. विजया बर्गे व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

आपल्या सुरेल स्वरांनी आणि गाण्यांनी संपूर्ण विश्वाला मंत्रमुग्ध करणाऱ्या आणि संगीत विश्वातील विविध पुरस्कार प्राप्त भारतरत्न स्वर्गीय लता मंगेशकर यांच्या कार्याला या वेळी उजाळा देण्यात आला. यांनी दिला. मृणाली ताडे आणि योगिता वेदपाठक यांनी आपले विचार व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा. तेजस्विनी कांदे, तर आभार प्रा. प्रशांत खाडे यांनी मानले. कार्यक्रमासाठी डॉ. अमित कसबे यांनी सहकार्य केले.

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical
Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

सकाळ पुणे, बुधवार, २७ एप्रिल २०२२

## उरसळ महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन उत्साहात

**मुंढवा** : पुणे जिल्हा शिक्षण मंडाळाच्या खराडी येथील शंकरराव उरसळ कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व स्नेहसंमेलन आमदार नीलेश लंके यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे सांस्कृतिक कला मंदिरात झाला. या प्रसंगी माजी नगरसेवक महेंद्र पठारे, प्राचार्य डॉ अशोक भोसले, लॉ कॉलेजच्या प्राचार्या डॉ रंजना पाटील, फार्मसी महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा अश्विनी शेवाळे, अरुणा गुळुंजकर, जयश्री जावीर, दशरथ बोरुडे, उपप्राचार्य डॉ. विजया बर्गे आदी मान्यवर उपस्थित होते. आजच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी स्वतःचे ध्येय निश्चित करून, स्पर्धा परीक्षांकडे झोकून देत स्वतःचे अस्तित्व निर्माण करणे गरजेचे आहे, शिक्षणाबरोबरच व्यावसायिक क्षेत्रात काम करताना एक आदर्श समाजापुढे ठेवा, असे प्रतिपादन आमदार लंके यांनी केले.



PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical
Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

सकाळ पुणे, गुरुवार, १४ ऑक्टोबर २०२१ ५

# वक्तृत्व स्पर्धेत सायली खांदवे प्रथम

## पुणे जिल्हा शिक्षण मंडळातर्फे आयोजन; काव्यलेखनात रोशनी कदमची बाजी

**पौड, ता. १३ :** राज्याचे उपमुख्यमंत्री, पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त संस्थेच्यावतीने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी घेतलेल्या ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धेत खराडीच्या सायली खांदवे, काव्य लेखनात आकुर्डीच्या रोशनी कदम आणि एकांकिका स्पर्धेत हडपसरच्या सविता वालकर या विद्यार्थिनींनी प्रथम क्रमांक पटकावला.

विविध स्पर्धांतील प्रथम तीन क्रमांकाचे विद्यार्थी आणि महाविद्यालयांची नावे पुढीलप्रमाणे - वक्तृत्व - सायली खांदवे (सासवड), सायली आरूडे (निगडी), प्रतिक्षा पंडित (सासवड). राज्यस्तरीय काव्यलेखन - रोशनी कदम (आकुर्डी), अपर्णा कलंत्री (अमरावती), रोहीत मालपोटे (पौडरोड), राज्यस्तरीय एकांकिका - सविता वालकर (हडपसर), अमृता जाधव (नसरापूर), डॉ. श्वेता मोरे (निगडी).

पीपीटी बनविणे (अध्यापक) - डॉ. मनिषा शेवाळे (बाबूरावजी घोलप महाविद्यालय, सांगवी), डॉ. के. एस. दिव्यश्री (निगडी), प्रा. आकाश बागडे (रामकृष्ण मोरे महाविद्यालय, आकुर्डी). व्हिडिओ बनविणे (अध्यापक) - डॉ. मनिषा शेवाळे (सांगवी), प्रा. विद्या कोठावळे (अनंतराव पवार महाविद्यालय, पिरंगुट), डॉ. एम. एच. मौलवी (अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय, ओतूर), रोबोटिक्स प्रतिकृती बनविणे - श्री. म्हाळसाकांत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, आकुर्डी, पंडित नेहरू विद्यालय, कामशेत, विष्णूजी शेकूजी सातव हायस्कूल, वाघोली.

आविष्कार संशोधन स्पर्धेतील विभागनिहाय प्रथम दोन क्रमांक पुढीलप्रमाणे - फार्मसी - प्रणाली जाधव (सासवड), केतकी थोरात (खराडी), मानवताशास्त्र - विवेकी पास्ता (सांगवी), ऊर्मिला सोनवणे (हडपसर), नितीन सुपेकर (हडपसर), इंजिनिअर अँण्ड टेक्नॉलॉजी - नेहा जाधव (मांजरी), प्रियांषु पुरोहित (आकुर्डी), मेडीकल - डॉ. निकीता लोलगे (निगडी), डॉ. स्नेहल सुपेकर (निगडी), विज्ञान - प्रज्ञा चव्हाण (हडपसर), दिनेश बेळगावकर (पौडरोड), वाणिज्य - तन्मयी तुलशी (सांगवी), तेजस्विनी कोकील (आकुर्डी), अंकिता व्हटकर (सांगवी), व्यवस्थापन - संतोष खलाटे (आकुर्डी), अश्विनी वाल्हेकर (आकुर्डी), कृषी - निधी सुधीर (आकुर्डी), अंकिता महाराणा (आकुर्डी). सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, मानद सचिव अॅड. संदीप कदम, खजिनदार अॅड. मोहनराव देशमुख, उपसचिव एल. एम. पवार, सहसचिव ए. एम. जाधव, अधिक्षक सोताराम अभंग, मूल्यमापन आणि शैक्षणिक संशोधन अधिकारी किरण देशपांडे, अकाउंटंट गोरख सोंडकर यांनी अभिनंदन केले.

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankerrao Ursal College of Pharmaceutical Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

प्रतिबिंब
सकाळ
पुणे, गुरुवार, ६ सप्टेंबर २०१८
४



खराडी : फार्मसी महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या राख्या व शुभेच्छा पत्रे विनोद पारे यांच्याकडे सुपूर्त करताना.

## फार्मसी महाविद्यालयातर्फे शुभेच्छा पत्रे

मुंढवा : भारतीय सैन्याच्या गौरवपूर्ण कार्यास वंदन करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करून फार्मसी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सरहद्दीवरील भारतीय सैनिकांना राख्या व शुभेच्छा पत्रांची भेट दिली. पुणे ज़िल्हा शिक्षण मंडळाच्या खराडी येथील शंकरराव उरसळ फार्मसी महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांनी बनविलेल्या सातशे राख्या व शुभेच्छा पत्रे सैनिक मित्र परिवारचे विनोद पारे यांच्याकडे सुपूर्द केली. याप्रसंगी प्राचार्य डॉ. अशोक भोसले यांनी मार्गदर्शन केले.

**PRINCIPAL**
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

सकाळ

सोमवार,
१७ सप्टेंबर २०१८ | ४



## अवतीभवती




**खराडी : शंकरराव उरसळ फार्मसी महाविद्यालयामध्ये शिक्षक दिनानिमित्त मार्गदर्शन करताना दशरथ बोरुडे.**

# उरसळ महाविद्यालयात शिक्षक दिन

**मुंढवा** : अभ्यासमधील तत्परता, एकाग्रता आणि श्रध्दा विद्यार्थ्यांना ध्येय मिळवून देऊ शकतो, असे मत आपत्ती व्यवस्थापन विभागाचे अधिकारी दशरथ बोरुडे यांनी व्यक्त केले. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, खराडी येथील शंकरराव उरसळ फार्मसी महाविद्यालयामध्ये शिक्षक दिन साजरा करण्यात आला. या वेळी बोरुडे बोलत होते. याप्रसंगी पुणे जिल्हा शिक्षण संस्थेचे आजीव सभासद प्रदीप कदम, स्वयंरोजगार कार्यालय अधिकारी प्रशांत नलावडे, महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास योजनेचे अधिकारी प्रमोद महाजन, प्राचार्य डॉ. अशोक भोसले, उद्योजक सुधीर जाधव, प्रा. अर्चना यादव व अश्विनी शेवाळे, आदित्य सिंग आदी उपस्थित होते.

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

सकाळ

शुक्रवार,
१२ ऑक्टोबर २०१८ | ७

# खराडीत राष्ट्रीय चर्चासत्र

**मुंढवा, ता. ११ :** पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या खराडी येथील शंकरराव उरसळ फार्मसी महाविद्यालयामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रायोजित 'इमर्जिंग ट्रेंड इन अनॅलिटिकल टेक्निक्स' या विषयावर दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले होते.

चर्चासत्रातून मिळणाऱ्या उच्चतम माहितीचा फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी संशोधनमध्ये उपयोग करावा, असे मत शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी उद्घाटनप्रसंगी व्यक्त केले. या वेळी प्राध्यापक सुजित काकडे संपादित 'माहिती पुस्तक विस्टा'चे अनावरण कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार बापू पठारे, पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे सचिव ॲड. संदीप कदम, एनसीएलचे संशोधक डॉ. भास्कर इंदगे, पुणे विद्यापीठाच्या केमिस्ट्री विभागाचे डॉ. पी. डी. लोखंडे, नवले फार्मसी महाविद्यालयांचे प्राचार्य डॉ. एस. डी. सावंत, प्राचार्य डॉ. अशोक भोसले आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. भास्कर इंदगे, डॉ. पी. डी. लोखंडे, डॉ. उदय देशमुख, डॉ. पी. रामलिंगम, डॉ. सागर वानखेडे, राजेंद्र भांडे, जे. व्ही. ध्रुवकुमार यांनी विविध विषयांवर उपस्थितांना मार्गदर्शन केले. चर्चासत्रात पुणे, सातारा, अहमदनगर, नाशिक जिल्हा व महाराष्ट्राबाहेरून ७० संशोधक व प्राध्यापक सहभागी झाले होते. चर्चासत्राच्या सांगता समारंभात सर्वांना सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात आले. या राष्ट्रीय चर्चासत्राचे नियोजन महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. विजया बर्गे यांनी केले, आभार प्रा. विक्रम वीर यांनी मानले.

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical
Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

लोकमत पुणे, मंगळवार, दि. ३० ऑक्टोबर २०१८ ५

# मतदार नोंदणी प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या खराडी येथील शंकरराव उरसळ फार्मसी महाविद्यालयांमध्ये मतदार नोंदणी अभियानाला विद्यार्थ्यांनी मोठा प्रतिसाद दिला. महाविद्यालयाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

माजी प्राचार्य एन.के. निंबाळकर यांनी या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले, की भारतीय लोकशाहीला सुदृढ करण्यासाठी सर्व नवमतदारांनी आपले नाव मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी पुढाकार घ्यावा. तरुण, विद्यार्थी यांनी यासाठी मतदार नोंदणी अभियानात सहभाग घेतला ही कौतुकास्पद बाब आहे. प्राचार्य डॉ. अशोक भोसले यांनी सांगितले, की मतदार नोंदणी अभियानात चार स्तरांवर काम केले जाईल, यामध्ये प्रथम संभाव्य मतदार शोध मोहीम, दुसरा टप्पा मतदार नोंदणी, तिसरा टप्पा निवडणूक पाठशाळा व चौथ्या टप्प्यात निवडणूक जनजागृती अभियान याप्रमाणे राबविण्यात येईल. नवमतदारांची नोंदणी करण्यात आली.

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

10 प्रभात पुणे, रविवार, दि. २४ जून २०१८



# उरसळ फार्मसी महाविद्यालयांमध्ये योगदिन

**विश्रांतवाडी,** दि. २३- पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या खराडी येथील शंकरराव उरसळ फार्मसी महाविद्यालयांमध्ये जागतिक योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

योगशिक्षक कमल ननावरे, डॉ. मृणाल जमदाडे आणि डॉ. सतीश तडवळकर यांनी योगाचे महत्त्व, आरोग्यासाठी उपयुक्तता, योगाची गरज, योग का करावा, कोणी करावा आणि कोणी करू नये, याविषयी मार्गदर्शन केले. उपस्थितांकडून योगांची प्रात्यक्षिके करुन घेतली. प्राचार्य डॉ. अशोक भोसले यांनी स्वागत करताना समाज माध्यमे व मोबाइल यांच्यावर जास्त वेळ वाया घालविला जातो. त्याऐवजी त्याचा योगासाठी सदुपयोग केल्यास सुदृढ आणि निरोगी आरोग्याची देणगी प्रत्येकाला मिळू शकते, असे सांगितले. पत्रकार नितीन जाधव यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, प्राचीन काळापासून ऋषीमुनींनी योगसाधना करून त्याचे महत्त्व जगाला पटवून दिले. याप्रसंगी विद्यार्थी व महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक, मान्यवर उपस्थित होते.

सुजीत काकडे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन सीमा केंजळे यांनी यांनी केले. प्रा. सचिन कोतवाल यांनी आभार मानले.

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical
Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

प्रतिबिंब
सकाळ
पुणे, गुरुवार, १९ जुलै २०१८
४

## औषधोपचार



उरुळी देवाची : उरसळ महाविद्यालयाने आरोग्य शिबिराचे आयोजन केले.

**मुंढवा** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या खराडी येथील शंकरराव उरसळ फार्मसी महाविद्यालयाच्या वतीने ज्ञानेश्वर माउली पालखी सोहळ्यात वैष्णवांसाठी मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिराचे आयोजन उरुळी देवाची येथे केले होते.

राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत आयोजित या शिबिरात पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांची वैद्यकीय तपासणी करून औषधोपचार करण्यात आले; उरुळी देवाची येथील डॉ. स्वप्निल भाडळे, डॉ. सारिका भाडळे आणि किशोर कुंभार, तसेच श्रीनाथ मेडिकल उरुळी देवाची यांनी आरोग्य तपासणी, प्रथमोपचार व उपयुक्त औषधे उपलब्ध करून दिले, असे सुजित काकडे यांनी सांगितले.

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical
Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

पुणे, गुरुवार, १२ जुलै २०१८
सकाळ
प्रतिबिंब

## उरसळ महाविद्यालयात शाहू महाराज जयंती

**मुंढवा** : लोककल्याणकारी राज्य ही संकल्पना राबविणाऱ्या छत्रपती शाहू महाराजांनी समाजातील सर्व घटकांना एकत्र सामावून घेऊन सामाजिक, आर्थिक व राजकीय सुधारणा राबविल्या, असे प्राचार्य डॉ. अशोक भोसले यांनी सांगितले. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या खराडी येथील शंकरराव उरसळ फार्मसी महाविद्यालयामध्ये छत्रपती शाहू महाराजांच्या १४४ व्या जयंतीदिनी घेतलेल्या कार्यक्रमात डॉ. भोसले बोलत होते. या प्रसंगी छत्रपती शाहू महाराजांना विद्यार्थी व शिक्षकांनी अभिवादन केले.



१ २ ३ ४ ५ ६

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical
Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

अमृतमहोत्सवी
स्थापना १९३९
# पुढारी
प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
www.pudhari.com
र । २८ जुलै २०१८ । स्थापना वर्ष ८० वे । आवृत्ती वर्ष ११ । मुंबई, पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अहमदनगर, नाशिक, सोलापूर, बे




आरोग्य शिबिरात उपस्थित मान्यवर.

## उरसळ महाविद्यालयात आरोग्य तपासणी

**चंदननगर :** माजी उपमुख्यमंत्री व पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबिर व रक्तदान शिबीराचे आयोजन खराडी येथील शंकरराव उरसळ कॉलेज ऑफ फार्मसी येथे करण्यात आले होते. सावित्रीबाई पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत व नोबेल हॉस्पिटल हडपसर यांच्या सहकार्याने आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन पुणे महापालिकेचे मा. नगरसेवक सुनील बनकर यांनी केले. यावेळी नगरसेवक भैयासाहेब जाधव, राष्ट्रवादी वडगाव शेरीचे उपाध्यक्ष सोमनाथ साबळे, प्राचार्य डॉ अशोक भोसले आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक पदविका विभागाचे प्रमुख प्रा. सचिन कोतवाल यांनी केले, आभार राष्ट्रीय सेवायोजना अधिकारी प्रा. सुजित काकडे यांनी मानले.

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical
Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

सकाळ Today
पुणे, शनिवार
२५ ऑगस्ट २०१८

## उरसळ महाविद्यालयात सद्भावना दिन

**मुंढवा, ता. २४ :** भारताचे माजी दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त शंकरराव उरसळ फार्मसी महाविद्यालयांमध्ये 'राष्ट्रीय सद्भावना दिन' साजरा झाला.

प्राचार्य डॉ. अशोक भोसले, उपप्राचार्या डॉ. विजया बर्गे, सुजित काकडे, प्रशांत खाडे, विपुल धसाडे आदी उपस्थित होते. राजीव गांधी यांच्या प्रतिमेला डॉ. भोसले यांनी पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले. सूत्रसंचालन तृषा शंग्रपवार, तर आभार विक्रम वीर यांनी मानले.

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical
Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

प्रतिबिंब

सकाळ ४

पुणे, गुरुवार, ६ सप्टेंबर २०१८



खराडी : फार्मसी महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या राख्या व शुभेच्छा पत्रे विनोद पारे यांच्याकडे सुपूर्त करताना.

## फार्मसी महाविद्यालयातर्फे शुभेच्छा पत्रे

मुंढवा : भारतीय सैन्याच्या गौरवपूर्ण कार्यास वंदन करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करून फार्मसी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सरहद्दीवरील भारतीय सैनिकांना राख्या व शुभेच्छा पत्रांची भेट दिली. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या खराडी येथील शंकरराव उरसळ फार्मसी महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांनी बनविलेल्या सातशे राख्या व शुभेच्छा पत्रे सैनिक मित्र परिवारचे विनोद पारे यांच्याकडे सुपूर्द केली. यावेळी प्राचार्य डॉ. अशोक भोसले यांनी मार्गदर्शन केले.

UVD - IHA

060918

P.D.E.A.'s S. U. College Of P. S. & R. C. Kharadi
INWARD NO.: 603
DATE: 6/9/18

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical
Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

उपनगर ५ पुढारी | पुणे, गुरुवार ४ ऑक्टोबर २०१८ *

## खराडी महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्र

**चंदननगर** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रायोजित इमर्जिंग ट्रेन्ड इन अनॅलिटीकल टेक्निक्स या विषयावर दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या खराडी येथील शंकरराव उरसळ फार्मसी महाविद्यालयामध्ये करण्यात आले. राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्रातून मिळणाऱ्या उच्चतम माहितीचा फार्मसी विद्यार्थ्यांनी संशोधनमध्ये उपयोग करावा, असे शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी उद्घाटनप्रसंगी सांगितले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मानद सचिव ॲड.संदीप कदम,माजी आमदार बापूसाहेब पठारे, एनसीएलचे संशोधक डॉ.भास्कर इंदगे, पुणे विद्यापीठाच्या केमिस्ट्री विभागाचे डॉ.पी.डी.लोखंडे, नवले फार्मसी महाविद्यालयांचे प्राचार्य डॉ एस.डी. सावंत, प्राचार्य डॉ अशोक भोसले उपस्थित होते.

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

सकाळ
रविवार,
२८ ऑक्टोबर २०१८
र.एन.आय.-१५५७/५७, रजि. नं. पी.सी.डब्ल्यू./०६९/२०१८-२०२०.

# खराडीतील महाविद्यालयात मतदार नोंदणी

**मुंढवा, ता. २७ :** भारतीय लोकशाही सुदृढ करण्यासाठी सर्व तरुणांनी आपले नाव मतदारयादीत समाविष्ट करून घ्यावे, असे प्रतिपादन माजी प्राचार्य एन. के. निंबाळकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या खराडी येथील शंकरराव उरसळ फार्मसी महाविद्यालयामध्ये मतदार नोंदणी जागृती अभियान राबविण्यात आले. या वेळी प्रा. सचिन कोतवाल, सुजित काकडे, तृषाशंग्र पवार उपस्थित होते. विद्यार्थी विकास अधिकारी प्राध्यापक प्रशांत खाडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. अशोक भोसले यांनी सांगितले, की मतदार नोंदणी अभियानात चार स्तरांवर काम केले जाईल. यामध्ये प्रथम परिसरातील संभाव्य मतदार शोधमोहीम, दुसरा टप्पा मतदार नोंदणी, तिसरा टप्पा निवडणूक पाठशाळा व चौथ्या टप्प्यात निवडणूक जनजागृती अभियान याप्रमाणे राबविण्यात येईल. या वेळी महाविद्यालयातील विद्यार्थी नवमतदारांची नोंदणी करण्यात आली.




खराडी : शंकरराव उरसळ फार्मसी महाविद्यालयामध्ये मतदार नोंदणीसंदर्भात मार्गदर्शन करताना एन. के. निंबाळकर.

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical
Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

# विद्यार्थ्यांनी स्वत:च्या प्रगतीकडे लक्ष द्यावे

**चंदननगर : वार्ताहर**

चांगला अभ्यास करून विद्यार्थ्यांनी स्वत:ची सर्वांगीण प्रगती आणि देशहिताकडे लक्ष द्यावे. जात, धर्म याकडे लक्ष न देता सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक घडामोडींवर लक्ष द्यावे, असे आवाहन इंडियन शुगर मिल्स असोसिएशन अध्यक्ष व पुणे जिल्हा परिषदेचे सदस्य रोहित पवार यांनी केले. ते पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या खराडी येथील शंकरराव उरसळ फार्मसी महाविद्यालयांच्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे सांस्कृतिक कला मंदिर येथे आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार बापूसाहेब पठारे हे होते. पवार म्हणाले, महाविद्यालयीन जीवनाचा पुरेपूर आनंद घेताना अभ्यासासोबत सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे यातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होऊन एक जबाबदार नागरिकही तयार होईल. बापूसाहेब पठारे म्हणाले, नो हॉर्न डे, वाहतूक नियमांचे पालन करणे, हेल्मेटची आवश्यकता या महाविद्यालयाच्या उपक्रमांचे कौतुक करून केवळ शिक्षण न देता सामाजिक भान जागे करण्याच्या प्रयत्नांना आपणही साथ देऊ असे सांगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक भोसले यांनी महाविद्यालयाच्या या उपक्रमांत शिक्षक व विद्यार्थ्यांचा सहभाग कसा असतो हे सांगितले.




**स्नेहसंमेलन कार्यक्रमात बोलताना मान्यवर.**

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.

पुणे, बुधवार, ३ एप्रिल २०१९ MY पुणे पुढारी ५

## 'फार्मसी' विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

चंदननगर : वार्ताहर

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या शंकरराव उरसळ खराडी फार्मसी महाविद्यालयामधील अंतिम वर्ष डी.फार्म, बी.फार्म व एम.फार्म विभागातील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात झाला.

बहुतांश विद्यार्थी नोकरी आणि व्यवसायासाठी पुणे, मुंबई, नाशिक व इतर ठिकाणी मोठ्या प्रमाणावर स्थलांतरित होतील या विद्यार्थ्यांच्या बरोबर नवनवीन विषयांवर चर्चा घडून यावी, या उद्देशाने निरोप समारंभ असल्याचे मत या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक भोसले यांनी व्यक्त केले. महाविद्यालयातून शिक्षण घेऊन जाणाऱ्या विद्यार्थ्यांनी पुढील काळात महाविद्यालयाच्या विकासासाठी योगदान द्यावे, असे आवाहन भोसले यांनी केले.

PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of Pharmaceutical
Sciences & Research Centre,
Kharadi, Pune-411014.